# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 01.10.2026** **वार : गुरुवार**

---

## ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या शताब्दीपूर्ती सोहळ्याला उपस्थित राहणार.
2. रब्बी हंगामासाठी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय.
3. गुजरातमध्ये विविध यंत्रणांनी केलेल्या कारवाईत 526 किलो अमली पदार्थ जप्त.
4. वेस्टइंडीज विरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत भारताची 2-0 अशी विजयी आघाडी; शुभमन गिलचं वेगवान द्विशतक.
5. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची आगेकूच सुरू; साताऱ्याच्या साहिल जाधवला तिरंदाजीत सुवर्णपदक.

## सविस्तर बातम्या

**पंतप्रधान मोदी**

केंद्रीय लोकसेवा आयोग, युपीएससीचा शताब्दीपूर्ती सोहळा आज दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. युपीएससीची स्थापना 1 ऑक्टोबर 1926 मध्ये झाली होती. आज होणाऱ्या सोहळ्यात पंतप्रधानांच्या हस्ते यूपीएससी शताब्दीच्या स्मरणार्थ एक नाणे, एका टपाल तिकीटाचं अनावरण होईल. देशातल्या आयोगाच्या कामकाजावर प्रकाश टाकणाऱ्या एका पुस्तकाचं प्रकाशनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान उपस्थितांना संबोधितही कऱणार आहेत.

**मोदी-ट्रम्प-चर्चा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल दूरध्वनीवरून संवाद साधत द्विपक्षीय मुद्दयांवर चर्चा केली. व्यापार, संरक्षण, ऊर्जा आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतल्या सहकार्याचा त्यांनी आढावा घेतला. आपली सर्वसमावेशक जागतिक धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी संवाद कायम ठेवण्यावर दोन्ही नेत्यांचं एकमत झालं. जागतिक शांतता आणि सुरक्षा यासाठी एकत्र प्रयत्न करण्यासह प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर विचार-विनिमय केल्याचं पंतप्रधानांनी समाजमाध्यमांवरील संदेशात त्यांनी सांगितलं.

**आधारभूत किंमत**

आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने काल 2027-28 या विपणन हंगामासाठी सर्व रबी पिकांच्या आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. समितीच्या बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माहिती दिली. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य मोबदला मिळावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे, असं वैष्णव यांनी सांगितलं. करडईसाठी प्रति क्विंटल 675 रुपये तर मोहरीसाठी प्रति क्विंटर 413 रुपयांची वाढ जाहीर झाली आहे. त्याशिवाय मसूर डाळीसाठी 390 रुपये, बार्ली 136 रुपये, हरभऱ्यासाठी 83 रुपये तर गव्हासाठी 25 रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे.

**शिवराज सिंह**

केंद्र सरकारनं 2026-27 या वर्षाच्या खरीप हंगामासाठी उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणामधील प्रमुख कडधान्यं आणि तेलबियांच्या किमान आधार योजनेअंतर्गत 5 हजार 547 कोटींहून थोड्या अधिक मूल्याच्या खरेदीला मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी आणि आत्मनिर्भर कृषी क्षेत्रासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह म्हणाले.

केंद्रीय मंत्रिमंडळानं ग्रीन एनर्जी कॉरिडॉरच्या तिसऱ्या टप्प्याच्या योजनेलाही मान्यता दिली. या उपक्रमामुळे आंतर-राज्यीय पारेषण प्रणाली मजबूत होईल. राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 135 गिगावॅटपर्यंतच्या नवीकरणीय ऊर्जेचं वहन करणं शक्य होईल, असं वैष्णव म्हणाले.

**राजनाथ सिंह**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज दिल्लीत संरक्षण लेखा विभागाच्या 279व्या वार्षिक दिन सोहळ्याला उपस्थित राहाणार आहेत. विभागाच्या विविध उपक्रमांचं उद्घाटन सिंह यांच्या हस्ते होणार आहे. भारतीय लष्कराच्या वित्तीय माहिती प्रणालीचं सक्षम या व्यासपीठाबरोबर एकत्रीकरण, संरक्षण मंत्रालयासाठी सुधारित राष्ट्रीय संकलन प्रणालीचा यात समावेश आहे. त्याशिवाय सिंह यांच्या हस्ते काही पुस्तिकांचेही प्रकाशन कऱण्यात येणार आहे.

**G-20-गोयल**

केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी काल अमेरिकेतल्या विस्कॉन्सिन इथं आयोजित G-20 व्यापारमंत्र्यांच्या बैठकीदरम्यान पोलंडचे अर्थ मंत्री आंद्रेजडोमान्स्की यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकविषयक संबंध अधिक दृढ करण्यावर चर्चा केली. तसेच, भारत-युरोपिय संघ मुक्त व्यापार करारामुळे व्यवसायांसाठी नवीन संधी निर्माण करण्यावरआणि दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्य अधिक बळकट करण्याच्या मुद्द्यावर विचार विनिमय केला. ही भेट फलदायी ठरल्याचं गोयल यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**गुजरात अमली पदार्थ जप्त**

गुजरात दहशतवाद विरोधी पथक, भारतीय तटरक्षक दल आणि केंद्रीय गुप्तचर यंत्रणांनी काल एकत्रितपणे केलेल्या कारवाईत 526 किलोहून अधिक अमली पदार्थ जप्त केले आहेत. या पदार्थांची किंमत जवळपास तीन हजार कोटी रुपये आहे. लक्षद्वीपच्या किनाऱ्याजवळ मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या इराणी जहाजाला अडवून झडती घेतली असता हा साठा सापडला. या बोटीतून पाच पाकिस्तानी नागरिकांना अटक कऱण्यात आली असून, गुजरात एटीएस पथक पुढील तपास करत आहे.

**सौदी विमान हल्ला**

दुबईहून इस्त्रायलच्या तेल अवीव इथं जाणाऱ्या फ्लाय दुबईचं विमान अपघातग्रस्त करण्याचा प्रयत्न कऱणाऱ्या ओमानच्या सहवैमानिकाला सौदी अरेबियाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली आहे. या घटनेत सह वैमानिकाने कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर चाकूने हल्ला करत दोन मिनिटांपेक्षा कमी वेळेत विमान 17 हजार फूट खाली नेण्यास भाग पाडले.  मात्र प्रवासी आणि विमान कर्मचाऱ्यांनी कॉकपिटमध्ये प्रवेश करत हल्लेखोराला ताब्यात घेऊन विमान स्थिरावण्यास मदत केली. त्यानंतर विमानाचा मार्ग बदलून ते सौदी अरेबियातील तबूक विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आलं. इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि संरक्षण मंत्री इस्त्रायल कॅट्झ यांनी या घटनेचे वर्णन एक गंभीर सुरक्षा घटना आणि संशयित दहशतवादी हल्ला असे केले आहे.

या घटनेत भारतीय नागरिक असलेले कॅप्टन स्मित मच्छार जखमी झाले असून, त्यांनी शौर्याने प्रतिकार केल्यानं मोठी दुर्घटना टळली.  इस्त्रायलचे पंतप्रधान तसेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी कॅप्टन स्मित मच्छार यांचं कौतुक केलं असून आकाशातील आपत्ती टाळणारे नायक अशा शब्दांत मच्छार यांचा गौरव केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही समाज

माध्यमावरील संदेशातून मच्छार यांच्या शौर्याचा गौरव केला आहे. कॅप्टन स्मित मच्छार यांच्यामुळे शेकडो लोकांचे प्राण वाचले, त्यांच्या धाडसी कार्याचा देशाला अभिमान आहे, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**खाण लिलाव**

खाण मंत्रालय आजपासून सागरी खनिज पट्ट्याचा लिलाव सुरू करणार आहे. भारताची सागरी खनिज क्षमता विकसित करण्यासाठी आणि दीर्घकालीन खनिज संसाधन सुरक्षितता बळकट करण्याच्या दिशेने उचललेलं हे एक महत्त्वाचं पाऊल आहे. या लिलावात, अंदमान समुद्र क्षेत्रातील दोन सागरी खनिज पट्ट्यांचा समावेश आहे.

**भारतोलन**

पुण्याच्या शर्वरी इनामदार यांनी कॅनडातल्या विनिपेग इथं झालेल्या राष्ट्रकुल भारतोलन स्पर्धेत 57 किलो वजनी गटात नऊ सुवर्णपदकांसह एक रौप्यपदक पटकावलं.

**क्रिकेट**

गुवाहाटी इथं काल झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताने वेस्ट इंडिजचा 8 गडी आणि 39 चेंडू राखून पराभव केला. या विजयामुळे भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. वेस्ट इंडिजने 7 गडी गमावून 405 धावा केल्या होत्या, हे लक्ष्य गाठताना रोहित शर्माने केलेली शानदार शतकी खेळी आणि कर्णधार शुभमन गिलच्या वेगवान नाबाद द्विशतकी खेळाच्या जोरावर भारताने हा विजय साकार केला. रोहित शर्माने एकदिवसीय कारकिर्दीतील 12 हजार धावांचा टप्पा पूर्ण केला आहे. या सामन्यात भारताने एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा धावांचा पाठलाग केला आहे. मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना न्यू चंदीगड इथं येत्या 3 ऑक्टोबर रोजी होणार आहे.

**आशियाई क्रीडा स्पर्धा**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत कालही भारतीय खेळाडूंनी शानदार कामगिरी केली. महाराष्ट्राचा साहिल जाधव आणि चिकिता तनीपर्थी या भारतीय जोडीने तिरंदाजीमध्ये अंतिम सामन्यात दक्षिण कोरियावर रोमहर्षक विजय मिळवत सुवर्ण पदक जिंकलं. सातारा जिल्ह्यातल्या साहिल जाधवच्या अचूक नेमबाजीमुळे महाराष्ट्राच्या क्रीडाक्षेत्रातही या कामगिरीचं विशेष कौतुक होत आहे.

या सुवर्णपदकाबरोबरच भारताने 2028 च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी तिरंदाजीतला कोटाही निश्चित केला आहे. भारताच्या महिला हॉकी संघानं दक्षिण कोरियाला पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे तर पुरुष आणि महिला स्क्वॉश संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश करत आणखी 2 पदके निश्चित केली आहेत.

या विजयांमुळे आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या खात्यात 10 सुवर्ण, 21 रौप्य आणि 29 कांस्य पदकांसह एकंदर 60 पदके जमा झाली आहेत.

**आजच्या स्पर्धा**

या स्पर्धेत आज पुरुष हॉकीच्या उपांत्य फेरीत भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. भारतीय महिला हॉकी संघाने चीनला पराभूत करून अंतिम सामन्यात आपलं स्थान आधीच निश्चित केलं आहे. क्रिकेटमध्ये, श्रेयस अय्यरच्या नेतृत्वातला भारतीय संघ आणि श्रीलंका यांच्यात उपांत्य फेरीतला सामना होणार आहे. याव्यतिरिक्त भारतीय खेळाडू नेमबाजी, ज्युडो, व्हॉलीबॉल, ट्रॅक सायकलिंग, अशा विविध स्पर्धांमध्ये आज सहभागी होतील.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.